महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग , जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी: ०२० -२६३६०९४१, २६३६२७७२

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या अभियांत्रिकी पदवी उत्तीर्ण उमेदवारांना ऑनलाईन टॅबच्या स्वरुपात महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत घेतल्या जाणाऱ्या अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षा तयारी नामवंत खाजगी संस्थेद्वारा प्रशिक्षण देणे योजना**

**योजनेचा उद्देश व स्वरूप :**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोविड- १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव असल्याने सध्या सर्व शाळा, महाविद्यालयातील प्रशिक्षण तसेच शिक्षण संस्थेतील सुरु असलेले सर्व कामकाज स्थगित आहे. परंतू संघ व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत कोविड पूर्व प्रकाशित झालेल्या नोकरी विषयक जाहिरातीच्या अनुषंगाने विविध स्पर्धा परीक्षा घेतल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे (उमेदवारांचे ) शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी सदर कालावधीमध्ये (फक्त सहा महिने ) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या एकूण ५० विद्यार्थ्यांना टॅब द्वारे ऑनलाईन स्वरुपात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले जाणार आहे

**विद्यार्थी निवड प्रक्रिया :**

सदर प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अभियांत्रिकी सेवा स्पर्धा परीक्षासाठी पात्र व योग्य विद्यार्थ्यांची / उमेदवारांची निवड त्यांना दहावी, बारावी, पदवी, या परीक्षेमध्ये प्राप्त गुणांस (Weightage) भारांक नुसार गुण दिले जातील व गुणानुक्रमे निवड यादी तयार केली जाईल.

निवड यादी तयार करणेसाठी उमेदवारांच्या प्राप्त गुणांना खालीलप्रमाणे भारांक (Weightage) दिले जाईल.

| वर्ग | भारांक |
|---|---|
| दहावी | ३० टक्के |
| बारावी | ३० टक्के |
| पदवी | ४० टक्के |
| एकूण | १०० टक्के |

जर निवड करताना काही उमेदवारांना समान गुण प्राप्त झाले असल्यास, त्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे त्या उमेदवारास प्रथम स्थान, त्यातही समान असतील तर ज्या उमेदवाराचे पदव्युत्तर पदवी ( Post Graduation ) शिक्षण झाले आहे व त्यामधील सर्वात जास्त गुण प्राप्त असलेल्या उमेदवारास संधी देण्यात येईल.

त्या नंतर सुद्धा काही उमेदवारांना समान गुण असतील तर PVTG मधील जमातीच्या उमेदवारास प्रथम संधी देण्यात येईल.

सदर योजनेचा आढावा घेण्यासाठी व अंमलबजावणी त काही अडचणी आल्यास उचित बदल करून त्यास मान्यता देण्याचे अंतिम अधिकार मा. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना असतील.

**उमेदवाराची सर्व साधारण पात्रता:**

i) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी /अधिवासी असला पाहिजे.

ii) उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे आवश्यक

iii) प्रशिक्षणासाठी उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.

iv) उमेदवारांच्या कुटुंबाचे सन २०२० -२१ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न रु. ८ लक्ष पेक्षा कमी असावे

v) प्रशिक्षणासाठी निवड करण्यासाठी उमेदवाराने अरेरावी, राजकीय व नोकरशाही दबावतंत्राचा वापर केल्यास त्याची उमेदवारी रद्द होईल.

vi) विद्यार्थ्याने खोटे कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेकडून संपूर्ण प्रशिक्षणाचा खर्च वसूल करून कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

vii) दिव्यांग व्यक्ती आणि महिला यांच्यासाठी नियमानुसार आरक्षण देण्यात येईल.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे पुढीलप्रमाणे : -**

१. विहित नमुना मध्ये संपूर्ण भरलेला अर्ज, त्यावर रंगीत सध्याचा फोटो असावा.
२. मूळ अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र स्कॅन प्रत
३. मूळ अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र स्कॅन प्रत
४. मूळ दहावी (S.S.C.) गुण पत्र व प्रमाणपत्र स्कॅन प्रत
५. मूळ बारावी ( H.S.C. ) गुण पत्र व प्रमाणपत्र स्कॅन प्रत
६. मूळ पदवी (Degree) गुण पत्र व प्रमाणपत्र स्कॅन प्रत
७. मूळ पदव्युत्तर पदवी (Post Graduation Degree) गुण पत्र व प्रमाणपत्र स्कॅन प्रत
८. मूळ डोमिसाईल प्रमाणपत्र स्कॅन प्रत
९. मूळ आधारकार्ड स्कॅन प्रत
१०. मूळ तहसीलदार यांनी दिलेला सेतू उत्पन्नाचा दाखला स्कॅन प्रत

वर नमूद लाभासाठी http://trti.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेल्या गुगल फॉर्मच्या लिंकवरूनच दिनांक १०.१२.२०२१ पर्यंत करावेत. ज्या उमेदवारांनी सदर लाभाकरिता आधी अर्ज केला असेल त्यांनीही पुनश्च अर्ज करावेत. उमेदवारांनी इतर कोणत्याही ई मेल आय.डी. वर अर्ज पाठवू नयेत, अशा पाठविलेल्या कोणत्याही अर्जाची दखल घेतली जाणार नाही.

( डॉ. राजेंद्र भारुड भा.प्र.से. )
आयुक्त